संपादकीय....

# शिवनेरी, रायगड, राजगडसह बारा किल्ले युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत, मान्यतेनंतर पुढे काय ?




छत्रपती शिवाजी महाराजांनी सह्याद्रीची दुर्गमता बघून ज्या अभेद्य किल्ल्याच्या आधारावर स्वराज्य निर्माण केले, त्या किल्ल्यांची दखल आता युनेस्कोने घेतली आहे. राज्यातील शिवनेरी, रायगड, राजगड, साल्हेर, लोहगड, प्रतापगड, सुवर्णदुर्ग, पन्हाळा, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग आणि तामिळनाडूतील जिंजी अशा बारा किल्ल्यांचा समावेश युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत मान्यता मिळाली आहे.

सप्टेंबरमध्ये युनेस्कोचे प्रतिनिधी या बारा किल्ल्यांच्या मूल्यमापनासाठी भेट घेतली होती.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील बारा किल्ले युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत मान्यता मिळवण्यासाठी पाठविण्यात आली होती. यामध्ये रायगड, साल्हेर, शिवनेरी, लोहगड, खांदेरी, राजगड, प्रतापगड, सुवर्णदुर्ग, पन्हाळा, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग आणि तामिळनाडूतील जिंजी किल्ल्यांचा समावेश होता . या सर्व किल्ल्यांच्या मूल्यमापनासाठी सप्टेंबर महिन्यात युनेस्कोची टीम किल्ल्यांना भेटी दिली होती.

या ऐतिहासिक क्षणी, सर्वजण एकत्र आले होते. आपल्या गौरवशाली इतिहासाचे संवर्धन करण्याची गरज असल्याचा विश्वास व्यक्त केला गेला. आजवर ज्यांनी गडकिल्ल्यांचे संवर्धन केले, त्यांचे संरक्षण केले, पुढील काळात विविध उपक्रम राबवणार आहोत, ज्यामुळे गडकिल्ले अधिक सुंदर, अधिक भक्कम आणि सुरक्षित होतील, अशी ग्वाही प्रशासनातील अधिकारी व जनतेने दिली होती. मात्र पुढे गड किल्ल्यांची देखभाल व दुरूस्ती , तेथील सोईसुविधा कायम ठेवणे आवश्यक आहे. अन्यथा युनेस्को वारसा यादीतील मान्यता परत काढून घेऊ शकते. याची दक्षता सर्वांनी घेणे आवश्यक आहे.

जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत किल्ल्यांचे जतन व संवर्धन जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत राज्यातील गड-किल्ले, मंदिरे व महत्वाची संरक्षित स्मारके इत्यादींच्या संवर्धनासाठी तीन टक्के निधीचा विनियोग करण्यात येत आहे. यामध्ये गडकिल्ल्यांचे जतन व संवर्धन, देखभाल व दुरुस्ती, पर्यटक व भाविकांसाठी सोई-सुविधा, सुशोभिकरण करण्यात येत आहे.

भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणकडे २८८ स्मारके

कातळात खोदलेल्या, जागतिक वारसा म्हणून सुप्रसिद्ध अशा अजिंठा-वेरूळ लेण्या, छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात उभे राहिलेले राजगड व सिंधुदुर्ग किल्ले, यादव व मराठा काळातील दर्गे व मकबरे, तसेच वसाहतकालीन स्थापत्यांचा समावेश आहे. ऐतिहासिक व पुरातन स्मारकांपैकी केंद्र सरकारमार्फत भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाने २८८ स्मारके राष्ट्रीय महत्त्वाची म्हणून जतन केलेली आहेत. त्यांची सुद्धा देखभाल, दुरूस्ती व पर्यटकांना सोईसुविधा देणे आवश्यक आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडकिल्ल्यांना मिळालेली युनेस्कोची जागतिक वारसा यादीतील मान्यता ही म हाराष्ट्रासाठी अभिमानाची आणि ऐतिहासिक क्षणाची नोंद ठरली आहे. या मान्यतेमुळे जगभरातील पर्यटकांचे लक्ष या दुर्गांवर केंद्रीत होणार असून, राज्यातील सांस्कृतिक पर्यटनाला मोठी चालना मिळणार आहे. मात्र केवळ मान्यता मिळवणे हे शेवटचे पाऊल नाही, तर ही केवळ सुरुवात आहे. या वारशाचे संवर्धन, जतन आणि देखभाल ही पुढील पिढ्यांची जबाबदारी आहे.

युनेस्कोच्या मान्यतेनंतर राज्य सरकार, स्थानिक स्वराज्य संस्था, पुरातत्त्व विभाग आणि स्थानिक ग्रामस्थ यांचा सहभाग वाढवून, गडकिल्ल्यांच्या दुरुस्ती व देखभालीसाठी दीर्घकालीन आराखडा तयार करण्याची गरज आहे. किल्ल्यांवरील अतिक्रमण, प्लास्टिक कचरा, अनियंत्रित पर्यटन यावर तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. युनेस्कोच्या वारसा यादीतील मान्यता टिकवण्यासाठी तेथील ऐतिहासिक रचना, नैसर्गिक परिसर आणि सांस्कृतिक वातावरण कायम राखणे अत्यावश्यक आहे. या संदर्भात स्थानिक युवकांना ङ्गगड मार्गदर्शकफ म्हणून प्रशिक्षण देऊन रोजगार निर्मिती करता येईल, तसेच पर्यटकांना इतिहास, वास्तुकला आणि गडांचे महत्त्व समजावून सांगण्याचे कार्य त्यांच्याकडून होऊ शकेल. शाळा-कॉलेज पातळीवर गड संवर्धन अभ्यासक्रम, वार्षिक गड स्वच्छता मोहीम आणि स्थानिक संस्कृतीशी निगडित उपक्रम यामुळे संवर्धनाची जाणीव वाढेल.

राज्य पर्यटन विभागाने गड-किल्ल्यांशी संबंधित पर्यटन आराखडा तयार करून, तेथे शिस्तबद्ध आणि मर्यादित संख्येने पर्यटकांना प्रवेश देण्याचे धोरण आखणे आवश्यक आहे. तसेच, वाहतूक, पाणीपुरवठा, शौचालय, माहिती फलक, तिकीटव्यवस्था अशा मूलभूत सुविधांचा दर्जा उंचावणे महत्त्वाचे आहे. डिजिटल माध्यमातून किल्ल्यांची आभासी सफर, मार्गदर्शक ॲप्स, ऑडिओ गाईड्स यांसारख्या सुविधा देऊन जगभरातील पर्यटकांपर्यंत पोहोचता येईल.युनेस्कोच्या मान्यतेमुळे या गडकिल्ल्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळख मिळाली असली तरी, तिची खरी किंमत तेव्हा समजेल जेव्हा आपण हे वारसे जतन करून पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवू. महाराष्ट्राची ओळख असलेले हे गडकिल्ले फक्त दगडमातीचे बांधकाम नसून, ते आपल्या स्वाभिमानाचे, संघर्षाचे आणि पराक्रमाचे प्रतीक आहेत. म्हणूनच, त्यांचे जतन ही केवळ सरकारी जबाबदारी नसून, प्रत्येक मराठी माणसाची बांधिलकी आहे.

# शोलेच्या यशाची कारणे!



## शोलेच्या जादूची पन्नाशी!

शोले हा भारतीय मसाला चित्रपटांचा राजा! तर गुरुदत्तचा प्यासा हा भारतीय क्लासिक चित्रपटांचा राजा! इतका की प्यासा हा चित्रपट जगभरातील फिल्ममेकींग प्रशिक्षण संस्थांमध्ये उत्कृष्ट चित्रपट कसा बनवावा यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन म्हणून दाखवला जातो. तर भारतीय सर्वसामान्य रसिकांपासून ते दिग्गज चित्रपट समीक्षकांपर्यंत झाडून सगळे शोलेच्या जादुई मोहिनीतून अजूनही बाहेर पडलेले नाहीत. एक परिपूर्ण मसाला चित्रपट कसा असावा याचे शोले हे उत्तम उदाहरण आहे.

शोलेचं गारूड चित्रपटरसिकांवर इतकं आहे की आज १५ ऑगस्ट २०२५ ला शोलेला पन्नास वर्षे झाली तरी या चित्रपटाची क्रेझ जशीच्या तशी आहे. किंबहुना, गेल्या पाच दशकांत ही क्रेझ पिढ्यान्पिढ्या वाढतच गेल्याचं लक्षात येते.आज पन्नाशीच्या आसपासची जी मंडळी आहेत, ती देखील या चित्रपटाची आठवण काढत काढतच मोठी झाली; हा चित्रपट आणि आम्ही देखील बरोबरच पन्नाशीत येऊन ठेपलो.

मला आठवतं, मी शोलेच्या अगोदरही थोडेफार चित्रपट पाहिले होते. त्या काळी रात्रीच्या वेळी रस्त्यावर पडदा बांधून त्यावर चित्रपट दाखवले जात. तेव्हा मी नारायण पेठेत, लोखंडी तालमीजवळ राहायला होतो - म्हणजे पुण्याच्या मध्यवर्ती भागात! त्यामुळे जवळपास कुठेही रस्त्यावर चित्रपट दाखवला जाणार असे समजले की आम्ही वाड्यातील चिल्लीपिल्ली मुलं ते सिनेमे बघायला जात असू!

त्यात मला आठवतं, मी शशी कपूरचा आ गले लग जा हा चित्रपट पाहिला आणि शशी कपूर इतका आवडून गेला की मग मी त्याचे फोटो साठवू लागलो, अगदी उशाला घेऊनसुद्धा झोपायचो. पण नंतर जेंव्हा शोले सिनेमा थिएटरमध्ये पाहिला, तेव्हापासून ते आजतागायत अमिताभ बच्चन याचेच राज्य चालू आहे मनावर! चित्रपट पाहण्याचे खऱ्या अर्थाने वेड हे या शोले सिनेमानेच लावले, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

शोले सिनेमाचे यश हे खऱ्या अर्थाने सर्वांगीण यश आहे. सिनेमाचे लोकेशन हे तर इतके अफलातून होते की त्यामुळे संपूर्ण चित्रपटाच्या कथानकाला या लोकेशन मुळे ठसठशीत जिवंतपणा आला. या लोकेशनला स्वतःचं व्यक्तीमत्व होतं!

दुसरं महत्त्वाचं कारण म्हणजे या चित्रपटातील कलाकारांची योग्य, चपखल निवड! ज्याला चित्रपट क्षेत्रात कास्टिंग असं म्हणतात! शोले हा सिनेमा म्हणजे खऱ्या अर्थाने ठाकूरची गोष्ट सांगणारा चित्रपट आहे. ठाकूर आणि गब्बर सिंग यांच्यातील संघर्ष हा या चित्रपटाचा विषय आहे, मग ठाकूर जय आणि विरू यांना या लढाईत सहभागी करून घेतो. त्यामुळे प्रथम धर्मेंद्रला ठाकूरची भूमिका करण्यात अधिक रस होता. पण मग विरूची भूमिका संजीव कुमारकडे जाईल आणि हेमामालिनी बरोबर संजीव कुमारला रोमान्स करायला मिळेल, असे वाटल्याने, धर्मेंद्रने ठाकूरच्या भूमिकेचा नाद सोडून विरूची भूमिका स्वीकारली.

या सिनेमातील गब्बर सिंगची भूमिका संजीव कुमार आणि अमिताभ बच्चनलाही आवडली होती. पण अखेर ती भूमिका अमजद खानच्याच नशिबात होती. इतकी की या भूमिकेसाठी आधी डॅनीची निवड झाली होती, पण डॅनीने आपला मित्र फिरोज खानच्या धर्मात्मसाठी, गब्बरच्या रोलसाठी मिळालेली सायनिंग अमाउंट, रक्कम पाच हजार रुपये निर्मात्यांना परत केले. मला इथे एक गोष्ट नमूद करावीशी वाटते, जी आजवर कोणीही मांडली नाही, आणि कोणाच्या लक्षातही आली नाही, ती ही की , ज्या धर्मात्माच्या भूमिकेसाठी डॅनीने शोले सिनेमा सोडला, त्याच सिनेमात हेमामालिनी सुद्धा होती, मग हेमामालिनीने शोलेत काम केले मग डॅनीच का मागे राहिला! तसेही धर्मात्मा सिनेमात हेमामालिनी पेक्षा कमी काम डॅनीचे होते. डॅनीने फिरोज खानला विनंती करून तिथले शूटिंग आधी संपवून तो शोले च्या शूटिंगला येऊ शकला असता, जशी हेमामालिनी आली.



असो जे ज्याच्या नशिबात असते ते होते, असंच म्हणावं लागेल. शेवटी गब्बरचा रोल अमजद खानच्या नशिबात होताच. तो त्याने अजरामर केला.

गब्बरची भूमिका अमिताभला इतकी आवडली होती, की शेवटी बऱ्याच वर्षांनी त्याने ती हौस राम गोपाल वर्माच्या शोलेच्या रिमेक मध्ये आग या सिनेमात पूर्ण करून घेतली.

शोलेचे यश बघून अनेक निर्मात्यांना त्या सारखे चित्रपट बनवावे वाटले. राम गोपाल वर्मांनी तर अलिकडे अलिकडे आग सिनेमा बनवला, पण शोलेच्या यशा नंतर लगेचच एका निर्मात्याने रामगड के शोले बनवला, तर सुभाष घई यांनी शशी कपूर आणि शत्रुघ्न सिन्हा यांना घेऊन गौतम गोविंदा नावाचा शोले सारखेच कथानक घेऊन सिनेमा बनवला पण शोलेचे यश त्याला मिळाले नाही, मग काही वर्षांनी सुभाष घई यांनी पुन्हा शोलेच्याच कथानकावर 'कर्मा' सिनेमा बनवला, यात दिलीप कुमार सह अनेक मोठी स्टारकास्ट घेण्यात आली, पण शोलेला टक्कर देईल असा एकही सिनेमा आजवर कोणी बनवू शकले नाही.

शेवटी एखादी कलाकृती जमून येण्यास सर्व घटक जमून यावे लागतात, आणि सिनेमा तर खऱ्या अर्थाने एक टीम वर्क असतं! सिनेमाची स्टोरी, संवाद, योग्य भूमिकेत योग्य कलाकार, गाणी, गीतकार, सिनेमाचं चित्रीकरण, लोकेशन, दिग्दर्शन इत्यादी इत्यादी, आणि या सर्व गोष्टी शोले सिनेमा वेळी घडून आल्या. ज्या पुन्हा शोले सिनेमाच्या निर्मात्यांना आणि दिग्दर्शक असलेल्या रमेश सिप्पी यांनाही, जुळवून आणता आल्या नाहीत.

जी.पी.सिप्पी आणि रमेश सिप्पी यांनी शोलेला समान टायटल शोधून 'शान' नावाचा सिनेमा बनवला, यात शोले मध्ये खेडेगाव होते, गब्बर सिंग जो गावठी, गावरान दाखवला, तो शान मध्ये आधुनिक तंत्रज्ञान वापरणारा व्हिलन शाकाल घेण्यात आला, त्याचा अड्डा पाण्याखाली दाखवला!

जो जेम्स बाँडच्या सिनेमात आधीच बघितला होता, असं असूनही, सुनील दत्तचे अपहरणाचे दृश्य आणि त्यांच्या मागे लागलेली कुत्री, ते पाठलागाचे दृश्य अशी काही दृश्ये अफलातून होती. अमिताभ बच्चन सह अनेक दिग्गज कलाकार एकत्र आले होते. सिनेमा चांगलाच होता पण, रमेश सिप्पी यांनाही दुसरा शोले बनवता आला नाही.

शोले हा सिनेमा खऱ्या अर्थाने कालातीत अशी कलाकृती ठरला! सांगण्यासारख्या बऱ्याच गोष्टी आहेत, ज्या आधीच सांगितल्या , बोलल्या त्याच पुन्हा सांगण्यात काय हाशील?

शोलेला या १५ ऑगस्टला पन्नास वर्षे झाली तशीच या सिनेमाची शताब्दी साजरी होईल, यात शंकाच नाही. शोलेच्या सर्व कलाकारांना आणि शोले जिवंत ठेवणाऱ्या सिनेरसिकांना खूप खूप शुभेच्छा!



@ श्रीकांत वाघ पुणे
भ्रमणध्वनी
९९२३३१६२११

# अमेरिकन आयात दबाव व वाढलेले शुल्क: भारतीय शेतीसमोर उभे ठाकलेले नवे आव्हान

ऑगस्ट २०२५ च्या महिन्यात अमेरिकेने भारतावर लावलेल्या अतिरिक्त आयात शुल्कांमुळे दोन्ही देशांमधील व्यापार तणाव झपाट्याने वाढला. काही वस्तूंवर हे शुल्क थेट पन्नास टक्क्यांपर्यंत नेण्यात आले, ज्यामुळे भारतीय निर्यातदारांसाठी हा एक मोठा आर्थिक धक्का ठरला. याच वेळी अमेरिकेने भारताकडून शेती उत्पादनांचे बाजार उघडून देण्याची मागणी पुन्हा आक्रमकपणे मांडली, विशेषतः मका, कापूस आणि दुग्धजन्य पदार्थांच्या मोठ्या प्रमाणात आयातीसाठी दबाव वाढवला. पहिल्या नजरेला या दोन गोष्टी स्वतंत्र भासू शकतात -

एक म्हणजे भारतीय वस्तूंवर अमेरिकेत जादा कर लावणे, जे निर्यातदारांसाठी थेट आव्हान आहे, आणि दुसरे म्हणजे भारताने कृषी बाजार अमेरिकेसाठी उघडावा अशी मागणी, जी देशांतर्गत पुरवठ्यावर दबाव आणते. मात्र ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या संदर्भात या दोन्ही घडामोडींचा एकत्रित विचार करणे आवश्यक आहे, कारण त्यांचा परिणाम थेट शेतकरी, कृषी कामगार आणि ग्रामीण उद्योगांवर होणार आहे.

अमेरिकेचा कर वाढवण्याचा निर्णय हा केवळ आर्थिक कारणांमुळे घेतलेला नाही. त्यामागे भूराजकीय कारणे देखील महत्त्वाची आहेत. भारताचे काही परराष्ट्र धोरणातील निर्णय - जसे की ऊर्जा व्यवहारातील स्वायत्तता, काही बहुपक्षीय मंचांवरील भूमिकेतून स्पष्ट होणारी स्वतंत्र भूमिका - हे अमेरिकेला अस्वस्थ करणारे ठरले. याशिवाय दोन्ही देशांतील व्यापार चर्चेतले अडथळे, विशेषतः कृषी क्षेत्रातील, हा देखील अमेरिकेच्या असंतोषाचा भाग आहे. परिणामी, आयात शुल्क वाढवून अमेरिकेने भारतीय वस्तू त्यांच्या बाजारात महाग केल्या, ज्यामुळे त्यांची मागणी कमी होईल, आणि याच वेळी हा निर्णय भारतावर दबाव आणण्यासाठी एक साधन म्हणून वापरला जाईल. उद्देश असा की भारताने आपले कृषी बाजार अमेरिकेसाठी मोठ्या प्रमाणात खुला करावा.

अमेरिकेच्या मागण्या प्रामुख्याने तीन उत्पादनांभोवती केंद्रित आहेत - मका, कापूस आणि दुग्धजन्य पदार्थ. या तिन्ही बाबतीत अमेरिकन शेती अत्यंत मोठ्या प्रमाणावर, यंत्रीकृत पद्धतीने आणि सरकारी अनुदानांच्या सहाय्याने चालते. त्यामुळे उत्पादन खर्च कमी होतो आणि त्यांना जागतिक बाजारात अतिशय स्पर्धात्मक दर ठेवता येतात. भारतीय लघुशेतकऱ्यांना अशा दरांशी स्पर्धा करणे जवळजवळ अशक्य होते. मक्याच्या बाबतीत अमेरिकेत प्रचंड उत्पादन होते, त्यातील मोठा हिस्सा जनावरांच्या खाद्यासाठी किंवा औद्योगिक वापरासाठी असतो. यातील बराचसा मका जनुकीय बदल केलेला असतो, जे भारतातील उत्पादनाच्या प्रकाराशी आणि वापराशी पूर्णतः वेगळे आहे. भारतातील मका प्रामुख्याने लहान शेतांवर घेतला जातो, स्थानिक बाजारांसाठी असतो आणि त्याचे उत्पादन प्रमाण कमी असते.

कापसाच्या बाबतीतही हेच चित्र आहे. अमेरिकन कापूस जागतिक बाजारात अनुदानामुळे स्वस्त मिळतो, त्यामुळे जागतिक दर खाली येतात. यामुळे भारतीय कापसाला योग्य भाव मिळणे कठीण होते. परिणामी, कापूस उत्पादक शेतकरी, जिरिंग उद्योग, व्यापारी आणि मजूर यांचे उत्पन्न कमी होते. शिवाय अमेरिकन कापसाचा एकसारखा उच्च दर्जा बाजारात अधिक मागणी मिळवू शकतो, ज्यामुळे पारंपरिक भारतीय कापूस मागे पडण्याचा धोका असतो.

दुग्धजन्य पदार्थांबाबत परिस्थिती अधिक गुंतागुंतीची आहे. अमूलसारख्या दुग्ध सहकारी संस्थांचे मॉडेल हे स्थानिक दूध खरेदीवर आधारित आहे. जर स्वस्त दरात आयात केलेले अमेरिकन दूध पावडर किंवा इतर दुग्धजन्य उत्पादने बाजारात आली, तर या सहकारी संस्थांची खरेदी क्षमता कमी होईल. दूध हा दररोज उत्पन्न देणारा व्यवसाय असल्याने त्याच्या भावात घसरण झाली, तर ग्रामीण कुटुंबांच्या रोख प्रवाहावर आणि संपूर्ण अर्थव्यवस्थेवर थेट परिणाम होईल.

या तिन्ही पिकांपैकी एखाद्याचे दर घटले तरी त्याचा परिणाम संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होतो. कारण एखाद्या पिकाच्या विक्रीतून मिळणारे पैसे गावातील खरेदी क्षमतेला चालना देतात, मजुरी दर टिकवून ठेवतात आणि स्थानिक अर्थचक्र चालू ठेवतात. भाव कमी झाल्याने खरेदी कमी होते, मजुरी कमी होते, कर्जफेड थांबते आणि आर्थिक घडी विस्कटते. महाराष्ट्रातील विदर्भ, गुजरातमधील सौराष्ट्र किंवा उत्तर प्रदेशातील दुग्धपट्टा अशा विशेष कृषी पट्ट्यांना अशा आयातीचा सर्वाधिक फटका बसू शकतो.

अशा परिस्थितीत भारताने काही ठोस पावले उचलणे अत्यावश्यक आहे. आयात नियंत्रण हे पहिले पाऊल ठरू शकते - बाजार एकदम उघडण्याऐवजी टप्प्याटप्प्याने उघडावा आणि तात्पुरत्या स्वरूपात संरक्षणात्मक शुल्क किंवा अँटी-डम्पिंग कारवाई करावी. मका व कापूस यांसारख्या पिकांच्या सरकारी खरेदी यंत्रणा अधिक मजबूत करणे, एमएसपी वाढवणे आणि त्याची काटेकोर अंमल बजावणी करणे आवश्यक आहे. अमेरिकन उत्पादने, विशेषतः जनुकीय बदल केलेली पिके आणि खाद्यपदार्थ, यांवर कडक लेबलिंग आणि तपासणी ठेवून ग्राहकांचा विश्वास आणि गुणवत्ता राखणेही महत्त्वाचे आहे.

राजनैतिक पातळीवर भारताने द्विपक्षीय आणि बहुपक्षीय मंचांवरून दबाव कमी करण्याचा प्रयत्न करावा, तसेच इतर विकसनशील देशांशी समन्वय साधावा. शेतकरी आणि स्थानिक संघटनांनी देखील स्वतःच्या पातळीवर काही पावले उचलणे गरजेचे आहे. संघटीत विक्री, सहकारी संस्थांमध्ये सहभाग, थेट मोठ्या खरेदीदारांना विक्री, पीक विमा, साठवणूक सुविधा, पीक विविधीकरण आणि कच्च्या मालाऐवजी प्रक्रिया केलेल्या उत्पादनांची विक्री अशा उपाययोजना शेतकऱ्यांना जोखीम कमी करण्यास मदत करू शकतात.

उत्पादन खर्च कमी करणे हे देखील अत्यंत महत्त्वाचे आहे. सूक्ष्म सिंचन, मृदा आरोग्य सुधारणे, दर्जेदार बियाणे वापरणे यामुळे शेतकऱ्यांची स्पर्धात्मकता वाढते. परंतु या सर्व प्रयत्नांसाठी केंद्र आणि राज्य सरकारांचे ठोस धोरणात्मक पाठबळ आवश्यक आहे.

अमेरिकेच्या अनुदानित आणि मोठ्या प्रमाणातील मका, कापूस आणि दुग्धजन्य पदार्थांच्या आयातीमुळे भारतीय लघुशेतकरी गंभीर आर्थिक दबावाखाली येऊ शकतात, आणि हे केवळ शेतकऱ्यांचे नव्हे तर संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेचे प्रश्न आहे. योग्य वेळी संरक्षणात्मक व्यापार धोरण, तांत्रिक गुंतवणूक, मूल्यवर्धन आणि संघटीत विपणन या उपाययोजना केल्यास या धोक्याचा परिणाम कमी करता येईल. अन्यथा, जागतिक बाजारातील स्पर्धा आणि स्थानिक बाजारातील बदल हे भारतीय शेती आणि ग्रामीण समाजासाठी मोठे आव्हान ठरतील.

- विक्रम कदम -

# पुणेतील महत्त्वाच्या ताज्या घडामोडी

**१. पिंपरी-चिंचवड मेट्रोचे नवे टप्पे सुरू**

पुणे मेट्रोचा पिंपरी-चिंचवड विस्तार प्रकल्प वेगाने सुरू असून, आकुर्डीपर्यंतच्या मार्गावरील कामाला गती मिळाली आहे. महापालिकेने डिसेंबर २०२५ पर्यंत हा टप्पा पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

**२. पावसाच्या पाण्याचा तुटवडा - पाणी कपात लागू**

पुणे महानगरपालिकेने खडकवासला धरणातील साठा कमी असल्याने १५ ऑगस्टपासून दर दुसऱ्या दिवशी पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे नागरिकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करण्याचे आवाहन केले आहे.

**३. औंध-जुनी संगमवाडी रस्त्याचे रुंदीकरण**

औंध ते जुनी संगमवाडी दरम्यानचा प्रमुख रस्ता रुंदीकरणासाठी बंद करण्यात आला आहे. वाहतुकीसाठी पर्यायी मार्गाची व्यवस्था केली असून, नागरिकांना प्रवासाची अतिरिक्त वेळ गृहीत धरावी लागत आहे.

**४. पीएमपीएमएल इलेक्ट्रिक बसेसचा प्रारंभ**

शहरात १०० नवीन इलेक्ट्रिक बसेस रस्त्यावर उतरल्या असून, प्रदूषण नियंत्रणासह प्रवाशांना आरामदायी प्रवास मिळणार आहे. पहिल्या टप्प्यात हडपसर, कात्रज आणि शिवाजीनगर डेपोमधून या बसेस चालवण्यात येत आहेत.

**५. पुण्यातील शैक्षणिक वर्षाची रंगत - प्रवेश प्रक्रिया पूर्ण**

पुण्यातील शाळा-कॉलेजांत प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली असून, काही लोकप्रिय महाविद्यालयांत ९०% पेक्षा जास्त कट-ऑफ लागला आहे. पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

**६. पुण्यात गणेशोत्सव तयारीला वेग - मंडळांकडून सजावट सुरू**

आगामी गणेशोत्सवासाठी पुण्यातील मंडळांकडून सजावट, रोषणाई व सांस्कृतिक कार्यक्रमांची आखणी सुरू झाली आहे. दगडूशेठ हलवाई गणपती, तुळशीबाग मंडळ, केसरीवाडा मंडळ यांच्याकडून भव्य स्वागत कमानी आणि थीम आधारित सजावट करण्यात येत आहे. पोलिसांनी उत्सव काळात कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्याची माहिती दिली आहे.

**७. पुण्यातील औंध रुग्णालयात नव्या यंत्रणांचा शुभारंभ**

औंध येथील जिल्हा रुग्णालयात नव्या डिजिटल एक्स-रे मशीन, सीटी स्कॅन यंत्रणा आणि ऑटोमेटेड लॅब चाचणी यंत्रणा सुरू करण्यात आल्या आहेत. या यंत्रणांमुळे रुग्णांना तपासणीसाठी कमी वेळ लागणार असून उपचारात गती येणार आहे. उद्घाटन प्रसंगी जिल्हाधिकारी आणि आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**१. पुण्यात पावसाने घेतली झडप - वाहतूक कोंडी, अनेक भागांत पाणी साचले**

पुण्यात गेल्या २४ तासांत झालेल्या मुसळधार पावसामुळे शहरातील अनेक भागांत पाणी साचले आहे. फर्ग्युसन कॉलेज रोड, शनिवारवाडा परिसर, कात्रज घाट आणि हडपसर येथे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण झाला आहे. महापालिकेच्या पथकांनी पाणी उपसण्याचे काम सुरू केले असून नागरिकांना अनावश्यक प्रवास टाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

'दैनिक महा मेट्रो', मालक, प्रकाशक, संपादक दिलीप किसन कुऱ्हाडे, यांनी श्री समर्थ प्रिंटर्स, शॉप नंबर १, बेसमेंट वर्तक अपार्टमेंट, ४९९, शनिवार पेठ, पुणे- ४११०३० येथे छापून फ्लॅट नंबर ९, फ्रेंड्स पॅराडाईज, शिरोळे रोड, शिवाजीनगर, पुणे ४११००४ येथे प्रकाशित केले.
वृत्तपत्रात छापलेल्या बातम्या, लेख, छायाचित्रे व जाहिराती यांच्याशी संपादक सहमत असेल असे नाही. कायदेशीर प्रकरणे पुणे न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.
मालक, प्रकाशक आणि संपादक दिलीप किसन कुऱ्हाडे - ९९२२९३०१९५, कार्यालय संपर्क क्रमांक : ९९७०६८८८६५ ( पी.आर.बी. कायद्याअंतर्गत बातम्याच्या निवडीसाठी जबाबदार.) Email : Mahametronews.pune1gmail.com

This 'Daily Maha Metro', Owner, Publisher by Dilip Kisan Kurhade printed at Shree Samarth Printers, Shop No. 1, Basement Vartak partment, 499, Shaniwar Peth, Pune 411030, Published from Flat No. 9, Friends Paradise Society, Shirole Road, Shivajinagar, Pune-411004.The editor does not necessarily agree with the news, articles, photographs and advertisements printed in the newspaper. Legal matters will be resolved under Pune Courts. Owner, Publisher Editor Dilip Kisan Kurhade Contact No. - 9922930195, Office Contact No. - 9970688865 (Responsible for selection of news under PRB ct.) Email. - Mahametronews.pune@1gmail.com